## नविन एफएल-3 मंजूरीसाठी लागणा-या आवश्यक कागदपत्रांची यादी

1) विहित नमुन्यातील अर्ज व त्यावर रु.5/- चे कोर्ट फी स्टॅम्प.
2) अर्जदाराचे नावे असलेली हॉटेल अनुज्ञप्ती (खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्र)
3) शॉप ॲक्ट लायसन्स, (जेथे लागू नसेल तेथे तसा दाखला स्थानिक प्राधिकरणाचा दाखला.)
4) ऐपतीचे प्रमाणपत्र कमीत कमी रु.1,00,000/- पर्यन्त
5) बँक गॅरंटी (अनुज्ञप्ती फीच्या 50% रकमेची बँक गॅरंटी अधीक्षक रा.उ. शुल्क यांच्या नावे सादर करावी.)
6) आयकर विभागाचे ना-देय प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र
7) विक्रीकर विभागाचे ना-देय प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र
8) हॉटेल मध्ये भागिदार असल्यास रु.500 च्या स्टॅम्पपेपरवर नोंदणीकृत भागिदारीपत्र
9) हॉटेल रेस्टॉरंटच्या दर्जा मुंबई विदेशी मद्य नियम 1953 मधील नियम 44 मध्ये नमुद केल्याप्रमाणे चांगला असल्याबाबत संबंधित स्थानिक प्राधिकारणाचा दाखला.
10) हॉटेलच्या जागेबाबत जागेचा 7/12 चा उतारा किंवा सिटी सर्व्हेचा उतारा.
11) हॉटेलची जागा भाडयाची असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र, जागेचा भाडे करार, जागा ज्यांच्या नांवे त्यांचा नांवे असल्याबाबत पुरावा
12) अन्न व औषध अनुज्ञप्ती.
13) हॉटेल सुरु असल्याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र
14) हॉटेल मधील खाद्यपदार्थाची यादी (मेनुकार्ड)
15) अर्जदाराच्या नावे कोणतही अनुसुचित अबकारी अनुज्ञप्ती नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.
16) नियोजित परवाना कक्षाची जागा मुंबई विदेशी मद्य नियम 1953 मधील नियम 45(1/सी) नुसार (म्हणजेच हॉटेल रेस्टॉरंटपासून 75 मिटरच्या आत नोंदणीकृत शैक्षणिक व धार्मिक संस्था, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचा स्टॅन्ड, डेपो, स्टेशन तसेच राज्य/राष्ट्रीय महामार्ग नसावा.) अंतरनिर्बंधमुक्त असल्याबाबतचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र.
17) राष्ट्रीय/राज्य महामार्गाच्या बाबतीत नागरी व औद्योगिक विभागात राष्ट्रीय व राज्य महामार्गाच्या मध्यपासुन 37 मिटर व अ- नागरी भागात राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यपासुन 75 मिटर व राज्य महार्गाच्या मध्यापासुन 50 मिटर एवढे कमीत कमी अंतर असावे. राज्य/राष्ट्रीय महामार्ग जर एखाद्या गावाच्या गावठाण हद्दीतून अथवा शहाराच्या नगरपालिका/ महानगरपालिका हद्दीतून जात असल्यास त्यास अंतरनिर्बंध लागू नाहीत. मात्र त्याबाबत तसा दाखला सक्षम प्राधिका-याचा असणे आवश्यकआहे.
18) हॉटेल रेस्टॉरंट व नियोजित परवानाकक्षाचे बांधकाम दर्शविणा-या नकाशाच्या चार नकाशामध्ये परवाना कक्षाची प्रस्तावित जागा लाल शाईने दर्शवावी.नकाशाच्या नील प्रतीवर परवाना कक्ष, हॉटेल/रेस्टॉरंट प्रसाधनगृह, स्वयंपाकगृह विदेशी मद्य भांडार, आदिंचे सविस्तर क्षेत्रफळ/बांधीव क्षेत्र (बिल्ड अप एरिया) नमूद करावे. नकाशावर अर्जदार, जागामालक, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम प्राधिकारी, व नकाशा तयार करणारा आर्किटेक्ट यांच्या स्वाक्ष-या आवश्यक आहे.
19) अर्ज शुल्क रु.1000/- शासकिय कोषागारात भरल्याबाबत मूळ चलन.
20) परवाना कक्षाची अंतर्गत रचना खालीलप्रमाणे असावी.
    अ) रेस्टॉरंटचे एकुण क्षेत्रफळ 25 चौ, मि. असावे.
    ब) परवाना कक्षाचे क्षेत्रफळ कमीत कमी 10 चौ, मी, असावे.
    क) रेस्टॉरंट पोटमाळयावर असल्यास त्याची कमीत कमी उंची 2 मीटर असावी.
    ड) रेस्टॉरंट मध्ये प्रसाधन गृहाची सोय असावी.
    इ) परवाना कक्षात मुख्य रेस्टॉरंटमधुन अथवा बाहेरुन प्रवेश असावा.

**21) प्रस्तावित जागेबाबतचा वाणिज्य वापराबाबतचा अकृषक आदेश/दाखला.**